# माहिती तंत्रज्ञान

सादरकर्ते-
आहेर नंदा बाळासाहेब
सहा.प्राध्यापक

# माहिती तंत्रज्ञान

- गेल्या काही वर्षात मानवी जीवनाची व्यावसायिक आर्थिक क्षेत्रे ही प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञान साधनांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर बदलून गेली आणि व्यावसायिक व आर्थिक क्षेत्रात मोठ्या झपाट्याने बदल घडून आले. 'माहिती तंत्रज्ञान', 'संगणक' हे या शतकाचे परवलीचे शब्द बनले आहेत. संगणकीय क्रांतीचे अविष्कार जीवनात पदोपदी दिसून येत आहेत.

# व्याख्या

- "संगणक, संप्रेषण आणि मायक्रो-इलेक्ट्रॉनिक्स साधनांच्या मार्फत विविध प्रकारची माहिती प्राप्त करणे, तिचे जतन व साठवणूक करणे आणि संक्रमण (देवाण-घेवाण) करणे म्हणजेच माहिती तंत्रज्ञान होय."

# माहिती तंत्रज्ञानाचे फायदे :

- १) जागतिकीकरण:
- माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांमुळे जग केवळ जवळ किंवा एकत्र आलेले नाही तर जग हे विविध कारणांनी एकमेकांवरती अवलंबून राहायला लागले आहे. या माहिती तंत्रज्ञानामुळे आपण केवळ माहितीची तात्काळ आणि सक्षमपणे देवाण-घेवाणच करू शकत नाही तर भाषिक आणि भौगोलिक अडथळे देखील दूर केले जातात.

# २) संप्रेषण

- माहिति तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संप्रेषण के अधिकाधिक स्वस्त, तात्काळ आणि सक्षम होत बाललेले आहे. जगातल्या कोणत्याही भागातल्या व्यक्तीशी आपण कुठूनही संपर्क साधू शकतो बरोबर जगातील कोणत्याही व्यक्तीशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आपण संवाद

# ३) व्यय परिणामकारकता

- विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये संगणक व अन्य माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर हा व्यावसायिक प्रक्रियेच्या पूर्णत्वासाठी केला जात असल्याने विविध व्यावसायिक प्रक्रिया या उदय परिणामकार व्यावसायिक प्रक्रियेला व्यावसायिक नफ्यात वाढ झाली व कामाच्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडून आली.

# सांस्कृतिक अंतर भरून काढणे :

- माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध व्यक्ती या परस्परांशी सहजपणे संपर्क प्रस्थापित करू शकत असल्याने त्यांच्यामध्ये संस्कृतीमुळे निर्माण होणारे जे अंतर असते ते सहजपणे भरून निघण्यास मदत होते. परिणामी,विविध प्रचार, श्रद्धा यांच्याबद्दल असणारे जे समज-गैरसमज असतात ते दूर होण्यास मदत होते.

# अधिकाधिक कालावधी :

- माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बरेचसे व्यवसाय हे २४ x ७ अशा प्रकारची सेवा लोकांना देऊ शकतात, त्यामुळे कोणत्याही स्वरूपाची व्यावसायिक क्रिया व्यक्ती कोणत्याही वेळेत करू शकते. ज्यामुळे विविध व्यावसायिक क्रिया सहज पार पाडणे सोपे जाते.

# माहिती तंत्रज्ञानाचे उपयोजन :

- व्यक्ती दर दिवशी संगणकाचा वापर हा वेगवेगळ्या नवनवीन मार्गांनी करू शकते. संगणक आणि अन्य तंत्रज्ञानाधारित साधने ही सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने माहिती तंत्रज्ञान हे अधिकाधिक प्रभावित होत चाललेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वापराबाबतीत माणूस हा अधिकाधिक त्यावरती अवलंबून राहायला लागला. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाने विविध व्यावसायिक क्षेत्रे स्वतःच्या अधीन करून घेण्यास सुरूवात केली.

# विज्ञान आणि अभियांत्रिकी

- विज्ञानाने त्याच्या उपशाखांमध्ये विशेषतः बायोटेक्नॉलॉजी विषयात जी प्रगती केलेली आहे ती अत्यंत स्पृहणीय अशी आहे. विज्ञानाच्या ज्या विविध उपशाखा आहेत या बहुतांशीपणे संगणक आणि संगणकाशी संबंधित साहित्यावरती आधारित आहेत. अभियांत्रिकी क्षेत्रात देखील माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा सक्षमपणे वापर केला जातो.

# व्यवसाय आणि वाणिज्य

- व्यवसाय आणि वाणिज्यातील ज्या महत्त्वपूर्ण नोंदी असतात त्या ठेवणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे तसेच व्यावसायिक वित्ताच्या नोंदी ठेवणे हे व्यवसाय क्षेत्रातील महत्त्वाचे काम माहिती तंत्रज्ञानाच्या साधनाच्या साहाय्याने यांसारख्या नोंदी माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केल्या जातात.

# शिक्षण

- माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांनी दैनंदिन मानवी जीवनावरती मोठ्या प्रमाणात दूरगामी परिणाम घडवून आणलेला आहे. क्वचितच अशी एखादी व्यक्ती असेल जिचे जीवन हे या माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रभावित झालेले नसेल. दर दिवशी माहिती तंत्रज्ञानाच्या वापराशी संबंधित काही नवनवीन शोध लागत आहे

# वैद्यकीय क्षेत्र

- माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घडून आलेल्या महाकाय परिवर्तनाचा फायदा हा वैद्यकीय क्षेत्राला मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. एक्स रे, सोनोग्राफी, एमआरआय यांसारख्या बाबींमुळे मानवी शरीरात निर्माण झालेल्या दोषाचे आत्यंतिक बारकाईने अबलोकन करता येते.

# आभार